(12)

**महाराष्ट्र शासन**

क्र.संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.१५७/विशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि.२८ फेब्रुवारी, २०१७

प्रति,

१. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू/प्र-कुलगुरू/कुलसचिव/विधी अधिकारी,
(कवी कुलगुरू संस्कृत विद्यापीठ, रामटेक, य.च.म.मुक्त विद्यापीठ नाशिक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे वगळून)
२. प्रकल्प संचालक, (रुसा)
३. सर्व संचालक, उच्च व तंत्र शिक्षण,
४. सर्व सह संचालक, उच्च व तंत्र शिक्षण,
५. सर्व उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

विषय:- दि.३. मार्च, २०१७ रोजी सह्याद्री अतिथिगृह येथे एक दिवसीय चर्चासत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा नागपूर येथील हिवाळी अधिवेशन, २०१६ मध्ये दोन्ही सभागृहांनी एक मताने मंजूर केला असून शासन अधिसूचना दि.११ जानेवारी, २०१७ अन्वये सदरहू कायदा प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तसेच सदरहू कायद्यातील कलम १ च्या पोटकलम २ नुसार दि.१ मार्च, २०१७ पासून सदरहू कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबतची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. नवीन विद्यापीठ कायद्याच्या यशस्वी अंमलबजावणीच्या दृष्टीने राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू/प्र-कुलगुरु/कुलसचिव/ विधी अधिकारी, प्रकल्प संचालक, (रुसा) सर्व संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, सर्व सह संचालक, उच्च व तंत्र शिक्षण व इतर सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना याबाबत योग्य मार्गदर्शन व दिशा निर्धारण होणे आवश्यक आहे.

३. त्या दृष्टीने मा.मंत्री (उ.व तं.शि.) व मा.राज्यमंत्री (उ.व तं.शि.) तसेच इतर तज्ञ व्यक्ती हे दि. ३ मार्च, २०१७ रोजी सकाळी १०.३० वा. ते सायं.५.०० वा. या कालावधीत उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांना मार्गदर्शन व दिशा निर्धारण करणार आहेत.

तरी, सदरहू चर्चा सत्रासाठी आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला,

(सिद्धार्थ खरात),
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मंत्री (उ.व तं.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री (उ.व तं.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.अमुस (उ.व तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
उप सचिव (विशि) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.